# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.02.2026** **वार- रविवार**

---

**महाशिवरात्री**

महाशिवरात्रीनिमित्त आज पुण्यातील विविध शिव मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे. श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात आज सकाळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अभिषेक, पूजा करण्यात आली. दुरुस्तीच्या कामामुळे मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद होतं. ओंकारेश्वर, संगमेश्वर, मृत्युंजयेश्वर मंदिर, तसंच जिल्ह्यातील सर्वच छोट्या मोठ्या शिवमंदिरांमध्ये आज रुद्राभिषेक, महाआरती तसंच विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**शिवजयंती**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आजपासून विचार प्रबोधन पर्वाचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या १९ फेब्रुवारीपर्यंत हा महोत्सव सुरू राहणार आहे.

**संतसेवालाल**

संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत उपमहापौर शर्मिला बाबर यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. संत सेवालाल महाराज यांनी समाजात समता, सेवा, नैतिकता आणि बंधुभाव यांचे संस्कार रुजवले, असं शर्मिला बाबर म्हणाल्या.

**<u>गानसारस्वती</u>**

गानसरस्वती किशोरी आमोणकर यांच्या भारतीय शास्त्रीय संगीतातील अलौकिक योगदानाला मानवंदना देणारा, गानसरस्वती महोत्सव सध्या पुण्यात सुरू आहे. यामध्ये आज प्रसिद्ध गायक आनंद भाटे यांनी आपल्या गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केलं. जयपूर घराण्याच्या ज्येष्ठ गायिका विदुषी पद्मा तळवलकर यांच्या गायनानं सकाळच्या सत्राची सांगता झाली.

**<u>गुंफणसाहित्यसंमेलन</u>**

भाषा ही संस्कृतीची वाहक आहे आणि संमेलनाच्या माध्यमातून समाज जोडला जातो. त्यामुळे संमेलनं गरजेची आहेत, अशी स्पष्ट भूमिका माजी आमदार आणि ज्येष्ठ विचारवंत उल्हास पवार यांनी आज पुण्यात मांडली. कराड इथली गुंफण अकादमी आणि भारतीय शिक्षण संस्थेनं आयोजित केलेल्या २१व्या गुंफण सद्भावना साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी पवार बोलत होते. संमेलनाध्यक्ष गझलकार सुनंदा शेळके यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. या संमेलनामुळे नव्या लेखकांना व्यासपीठ मिळत असल्याचं सुनंदा शेळके यावेळी म्हणाल्या.

**<u>गझलमित्रपुरस्कार</u>**

रंगत-संगत प्रतिष्ठान आणि करम प्रतिष्ठान यांनी आज पुण्यात राज्यस्तरीय मराठी गझल संमेलनाचं आयोजन केलं होतं. यावेळी गझलकार डॉ. कैलास गायकवाड यांचा गझलमित्र पुरस्काराने गौरव करण्यात आला.

**पुष्पप्रदर्शन**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यान आणि वृक्ष प्राधिकरण विभागातर्फे कालपासून फळे, फुले आणि भाजीपाला प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. जंगली महाराज रस्त्यावरील छत्रपती संभाजी उद्यानात उद्यापर्यंत, सकाळी ९ ते रात्री ८ या वेळेत हे प्रदर्शन पाहता येईल.

**बिझनेसएक्स्पो**

मराठा आंत्रप्रिन्युअर्स असोसिएशनच्या वतीनं येत्या २७ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत पुण्यात आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या या प्रदर्शनाची संकल्पना 'एकतेतून समृद्धीकडे' आणि 'मराठा समाज – उद्योजक समाज' या संकल्पनेवर आधारित आहे.

**निषेधआंदोलन**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी आज भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पुण्यात आंदोलन केलं. यावेळी भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते समोरासमोर आल्याने तणाव निर्माण झाला. या आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचा आरोप करण्यात येत आहे. यावेळी दगडफेक झाली, आणि त्यात एक काँग्रेस कार्यकर्ता जखमी झाल्याचा आरोप काँग्रेसनं केला आहे.

काँग्रेस भवनाबाहेर निर्माण झालेला तणाव आता निवळला असून या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान आंदोलनामध्ये दोन बातमीदारही जखमी झाल्याचं वृत्त आहे, हा हल्ला करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील यांनी केली आहे.

या प्रकरणी दोन्ही पक्षांनी परस्पर विरोधात गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिली.

**<u>बाजारसमिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून सुमारे नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. हिरवी मिरची, सिमला मिरची, गाजर, मटारसह काही पालेभाज्यांचे भाव वाढले आहेत. महाशिवरात्रीमुळे फळ बाजारात मागणी वाढली असून भावही वाढले आहेत. फुल बाजारात गेल्या दोन-तीन दिवसात फुलांना चांगला बाजार भाव मिळाला, आज मात्र जवळपास सर्वच फुलांचे भाव घटले आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३३ आणि किमान तापमान १५ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार!**